# प्र सि ध्दी प त्र क

## मानधन तत्वावर "मोडी मजकुराचा इंग्रजी व मराठीमध्ये अनुवाद" करून देणाऱ्या अनुवादकांची नामिका स्थापन करण्याबाबत.

प्रशासकीय, कायदेविषयक, वैद्यकीय, महसूल, शैक्षणिक, अभियांत्रिकी अशा विविध विषयातील "मोडी मजकुराचा इंग्रजी व मराठीमध्ये अनुवाद" करु शकणाऱ्या अनुवादकांची नामिका तयार करावयाची आहे. त्यासाठी मोडीतून इंग्रजी व मराठीत अनुवाद करू शकणाऱ्या अनुवादकांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

अटी व शर्ती :-

१) अनुवादकास प्रशासकीय, कायदेविषयक, वैद्यकीय, महसूल, शैक्षणिक, अभियांत्रिकी , पर्यावरण, संगणक तंत्रज्ञान यापैकी एक किंवा त्याहून अधिक विषयांचा अनुवाद करण्याचा अनुभव असावा.

२) अनुवादकास मोडी, इंग्रजी व मराठी या तिनही विषयांचे उत्तम ज्ञान असणे आवश्यक आहे.

३) ज्या व्यक्तींनी उपरोक्त एक किंवा अनेक विषयांमध्ये स्वत: अनुवाद करुन पुस्तके प्रकाशित केली आहेत अशा व्यक्ती देखील अर्ज करू शकतात.

४) अनुवादकास पुरेसे संगणक ज्ञान आवश्यक आहे. अनुवादकांकडे इंटरनेटसह संगणकाची सुविधा असावी.

५) मोडी / इंग्रजी / मराठी विषयातील पदव्युत्तर पदवी/पदवी/अनुवाद पदविका अभ्यासक्रम पूर्ण केलेले उमेदवार देखील यासाठी अर्ज करू शकतात.

६) नामिकेतील तज्ज्ञ अनुवादकांना अनुवादांची कामे शासनाच्या विविध विभाग, मंडळे, महामंडळे यांच्याकडून परस्पर पाठविण्यात येतील तसेच संबंधित विभाग व कार्यालय आणि तज्ज्ञ अनुवादक यांच्यामध्ये ठरविण्यात येईल अशा कालावधीत ही कामे नामिकेतील अनुवादकांना विहित मुदतीत पूर्ण करून द्यावी लागतील.

७) नामिकेतील अनुवादकांना शासन वेळोवेळी निश्चित करील त्या मानधन दरानुसार मानधन अनुज्ञेय राहील.

८) तज्ज्ञ अनुवादकाने अनुवादित केलेल्या अनुवादाच्या अचुकतेची जाबाबदारी सर्वस्वी संबंधित अनुवादकाची राहील.

९) अनुवादकांनी त्याच्या कामाचा सहामाही अहवाल विहित नमुन्यात या कार्यालयाकडे पाठविणे आवश्यक राहील.

१०) नामिकेतील तज्ज्ञांना त्यांची अचूकता, कार्यक्षमता व कार्यतत्परता विचारात घेऊन वगळण्याचा तसेच नामिकेत नवीन तज्ज्ञांचा समावेश करण्याचा अधिकार या कार्यालयाचा राहील.

तरी संबंधितांनी आपले अर्ज मूळ प्रमाणपत्रांच्या साक्षांकित छाया प्रतींसह भाषा संचालनालय, नवीन प्रशासकीय इमारत, ५ वा मजला, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०००५१ या पत्तयावर दि.१७.१०.२०२५ पर्यंत पाठवावेत.

भाषा संचालक,
महाराष्ट्र राज्य.

f:\data bhasha pavan patil sir ९.६.२५\d\jadhav\जाधव\
४१